दैंनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार




• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/7448 • शनिवार दि.२५ एप्रिल २०२६ • अंक-९४ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

# आमदार संजय गायकवाडांचे विधान विकृत व गुन्हेगारी स्वरुपाचे

## कारवाई करण्यास सरकार का घाबरते? हर्षवर्धन सपकाळांचा सवाल

**मुंबई (वृत्तसंस्था)**
शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना अर्वाच्च भाषेत शिविगाळ केलीच पण त्यांची भाषा अत्यंत घाणेरडी, विकृत व गुन्हेगारी प्रवृत्तीची आहे. आमदार गायकवाड यांनी यावेळी कॅाम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्येबाबतही भाष्य केलेले आहे, अशा विकृत व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या आमदारावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कारवाई करण्यास का घाबरतात?, असा प्रश्न महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी विचारला आहे.



गांधी भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, आमदार संजय गायकवाड हे सातत्याने दादागिरी व गुंडगिरी करत असतात. आमदार कॅंटिंनमध्ये कामगारांना मारहाण करणे, बुलढाण्यात वाळू तस्करी, जबरदस्तीने जमीन बळकावणे, कोणालाही अत्यंत खालच्या भाषेत शिविगाळ करणे, ही त्यांची गुन्हेगारी कृत्ये सुरुच आहेत. एवढेच काय तर भाजपा हा हिजड्यांचा पक्ष आहे, देवेंद्र फडणवीस यांच्या तोंडात कोरोनाचे जंतू सोडा, राहुल गांधी यांची जीभ छाटणाऱ्यास १० लाखांचे बक्षीस देऊ, असे प्रताप या आमदार महोदयांनी यापूर्वी केले आहेत. फडणवीस यांच्यात हिम्मत असेल तर त्यांनी त्यांच्या पक्षाला दिलेल्या शिव्यांची तरी दखल घेऊन आमदार संजय गायकवाड यांच्यावर कठोर कारवाई करायला हवी, पण मुख्यमंत्री मात्र याला आमदाराला पाठीशी घालत आहेत, असे सपकाळ म्हणाले.

'शिवाजी कोण होता?' हे पुस्तक आपल्यासाठी मोठा दस्तावेज आहे, पण या पुस्तकावर बोलताना आमदार संजय गायकवाड यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचाही अपमान केला. भाजपा व त्यांचे हस्तक शिवाजी महाराज यांचा अवमान करत असतात, राहुल सोलापूरकर, प्रशांत कोरटकर यासारख्या विकृतांनी महाराजांचा अपमान केला त्यावेळीही फडणवीस यांनी बोटचेपी धोरण स्विकारले होते. भगतसिंह कोश्यारी, मंगलप्रभात लोढा यांनीही महाराजांचा अपमान केला, त्यावेळीही फडणवीस यांनी काहीच कारवाई केली नाही. छत्रपतींचा अपमान करणाऱ्यांचे फडणवीस एकप्रकारे समर्थनच करत आहेत, असे यावरून दिसते असेही सपकाळ म्हणाले.

## मिशन भरारी' अंतर्गत विद्यार्थ्यांचे इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत होणार प्रयाण

**संतोष पडवळ । ठाणे**
ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'मिशन भरारी' या अभिनव शैक्षणिक उपक्रमांतर्गत निवड झालेल्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या अभ्यासदौऱ्यास मा. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखविण्यात येणार आहे. हा शुभेच्छा समारंभ दिनांक २७ एप्रिल, २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा नियोजन भवन, ठाणे येथे आयोजित करण्यात आला आहे.'मिशन भरारी' या उपक्रमाचे औपचारिक अनावरण प्रजासत्ताक दिनाच्या औचित्य साधून दि. २६ जानेवारी, २०२६ रोजी करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेतून जिल्हास्तरावर निवड झालेल्या ५९ गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी दि. २७ एप्रिल २०२६ ते १ मे २०२६ या कालावधीत देशातील नामांकित वैज्ञानिक केंद्रांना शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले आहे.



हा अभ्यासदौरा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या संकल्पनेतून आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांचे मार्गदर्शनातून राबविण्यात येत असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक /वैज्ञानिक संधी उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अनुभवातून विज्ञान आणि तंत्रज्ञान समजून घ्यावे, तसेच मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने या अभ्यासदौऱ्याची आखणी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनाकडून सातत्याने अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन दिले जात असून 'मिशन भरारी' हा त्याचाच एक महत्त्वपूर्ण भाग आहे.या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना विमान प्रवासाची संधी मिळणार असून तिरुअनंतपुरम व कन्याकुमारी येथील विविध वैज्ञानिक व ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यात येणार आहे. विक्रम साराभाई अवकाश केंद्र, थुंबा इक्वेटोरियल रॉकेट लॉन्चिंग स्टेशन, केरळ सायन्स अँड टेक्नॉलॉजी म्युझियम व प्रियदर्शिनी प्लॅनेटेरियम यांसारख्या ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे. तसेच स्वामी विवेकानंद स्मारक, थिरुवल्लुवर पुतळा व इतर पर्यटन स्थळांनाही भेट दिली जाणार आहे.या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे, शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे तसेच विज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाबाबत जिज्ञासा निर्माण करणे हा आहे. विद्यार्थ्यांना वैज्ञानिक संशोधन, अवकाश विज्ञान व आधुनिक प्रयोगशाळांचा प्रत्यक्ष अनुभव मिळून त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक वाटचालीस नवी दिशा मिळणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी दिली.

## महानगर गॅस लिमिटेड, कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या सहकार्याने बदलापूरमध्ये मेगा पीएनजी नोंदणी शिबिराचे आयोजन करणार

**नवी मुंबई । प्रतिनिधी**
कल्याणमधील आपल्या अलीकडील उपक्रमाला मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादानंतर, भारतातील अग्रगण्य शहर गॅस वितरण (सीजीडी) कंपन्यांपैकी एक असलेल्या महानगर गॅस लिमिटेड (एमजीएल), कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या (केबीएमसी) सहकार्याने, स्वच्छ आणि सोयीस्कर स्वयंपाकाच्या इंधनाचा वापर वाढवण्यासाठी बदलापूरमध्ये एका मेगा पीएनजी (पाईप नॅचरल गॅस) नोंदणी शिबिराचे आयोजन करणार आहे.



हे शिबिर रविवार, २६ एप्रिल २०२६ रोजी आमदार किसन कठोरे जनसंपर्क कार्यालय, डीपी रोड, बेलावली, बदलापूर (पश्चिम) येथे आयोजित केले जाईल. सकाळी १०.०० ते दुपारी ०२.०० आणि सायंकाळी ०५.०० ते रात्री ०९.०० अशा दोन निश्चित वेळेमुळे, रहिवाशांना त्यांच्या सोयीनुसार भेट देऊन दिवसा नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याची लवचिकता मिळेल.

अलीकडील केंद्र सरकारच्या आदेशानुसार रहिवाशांना जागेवरच मदत आणि मार्गदर्शन देऊन, घरगुती पीएनजी कनेक्शनसाठी ऑनबोर्डिंग प्रक्रिया सुलभ करणे, हे या पीएनजी नोंदणी शिबिराचे उद्दिष्ट आहे. रहिवाशांना एक सुलभ आणि सुयोग्य मार्गदर्शन मिळेल, कारण प्रशिक्षित एमजीएल कर्मचारी संपूर्ण प्रक्रियेदरम्यान प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी, कागदपत्रांसाठी मदत, जागेवरच नोंदणी, कनेक्शनची प्रक्रिया समजून घेणे आणि पीएनजी नोंदणी जागेवरच पूर्ण होईल याची खात्री करण्यासाठी उपलब्ध असतील.

पीएनजीकडे वळल्याने घरांना अखंडित पुरवठा आणि एक स्वच्छ पर्याय मिळतो, तसेच दीर्घकालीन सोय आणि खर्चात बचतही होते. एमजीएल बदलापूर आणि आसपासच्या परिसरातील सर्व रहिवाशांना या वाढत्या चळवळीत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित आणि आमंत्रित करत आहे.

अधिक माहितीसाठी, रहिवासी शिबिराच्या वेळेत स्थळावर एमजीएलच्या प्रतिनिधींशी संपर्क साधू शकतात. एमजीएल आपल्या सर्व भौगोलिक क्षेत्रांमध्ये विश्वसनीय पुरवठा सुधारित सेवा वितरण सुनिश्चित करण्यासाठी आपल्या पायाभूत सुविधा आणि ग्राहक प्रतिबद्धतेचे प्रयत्न अधिक बळकट करत राहील.

# 'ग्राम स्वराज्य', चला खेडी वाचवू या-सामाजिक कार्यकर्ते विलास गावंड यांचे जनतेला आवाहन

## शाश्वत विकास आणि प्रशासकीय संवेदनांचा कस याबाबत केली भावना व्यक्त

**उरण । प्रतिनिधी**

मानवी संस्कृतीचा पाया 'अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य' या पंचसूत्रीवर उभा आहे. निसर्ग आणि मानवी जीवन हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मात्र, आजच्या आधुनिकतेच्या आंधळ्या शर्यतीत आपण निसर्गापासून दूर गेलो आहोत. महात्मा गांधीजींनी दिलेला 'खेड्यांकडे चला' हा मंत्र केवळ एक घोषणा नव्हती, तर ती एक परिपूर्ण, समाधानी आणि निसर्गपूरक जीवनशैलीची दिशा होती. आज वाढती उष्णता, प्रदूषण आणि कचऱ्याचे डोंगर पाहता, गांधीजींचा विचार आणि विनोबांची कर्मनिष्ठा पुन्हा एकदा अंगीकारण्याची वेळ आली आहे.असे मत उरण मधील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते विलास गावंड यांनी व्यक्त केले असून विविध सोशल मीडिया व जनतेला प्रत्यक्ष भेटून ते या बाबत जनजागृती करीत आहेत.

आपले प्रशासक आणि लोकप्रतिनिधी शिक्षित आहेत परंतु साक्षर आणि सार्थक यातील धुसर संभ्रमात आहेत. त्यामुळे प्रशासकीय अनास्था आणि विकास म्हणजेच बांधकाम या चुकीच्या धोरणामुळे जनतेच्या घामाच्या पैशातून, कराच्या माध्यमातून सरकारी निधीतून सुशासन होणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात चित्र वेगळे दिसते. शहरांमध्ये टोलेजंग इमारती आणि सिमेंटचे रस्ते होत आहेत, पण श्वास घ्यायला शुद्ध हवा आणि प्यायला शुद्ध पाणी मिळवणे कठीण झाले आहे. विकासाचे आराखडे आखताना पादचारी, सायकलस्वार किंवा सामान्य माणसापेक्षा मूठभर धनदांडग्यांच्या सोयीचा विचार प्राधान्याने केला जात आहे. ही विकासाची चुकीची धोरणे भविष्यात पर्यावरणाचा समतोल बिघडवण्यास कारणीभूत ठरत आहेत.

आचार्य विनोबा भावे यांनी आयुष्यभर विचार आणि व्यवहाराची सांगड घातली. त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली. आजच्या 'वापरा आणि फेकून द्या' या संस्कृतीमुळे कचऱ्याची समस्या गंभीर झाली आहे. भविष्यातील संकटांवर मात करण्यासाठी आपल्याला एक अशी 'इकोसिस्टिम' हवी आहे, जिथे कचरा ही समस्या न राहता ती 'संपत्ती' बनायला हवी. विकेंद्रित पद्धतीने कचऱ्याचे खतात रूपांतर होऊन ती मातीला परत मिळायला हवी.



पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवणारी यंत्रणा हवी, जेणेकरून टँकरमुक्त गावे निर्माण होतील. केवळ काँक्रीटचे हायवे नकोत, तर झाडांच्या सावलीत असणारे सायकल ट्रॅक आणि चालण्यासाठी सुरक्षित पदपथ हवेत. जोपर्यंत आपली गावे स्वयंपूर्ण होत नाहीत, तोपर्यंत शहरांवरील ताण कमी होणार नाही. महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील 'ग्रामस्वराज्यात अन्नापासून ऊर्जेपर्यंत सर्व गोष्टी स्थानिक पातळीवर निर्माण होणे अपेक्षित होते. सौर ऊर्जा, सेंद्रिय शेती आणि स्थानिक रोजगाराला प्राधान्य दिल्यास 'स्वदेशी'चे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार होईल. प्रशासकांनी केवळ फाईलवरचे आकडे न बघता, जमिनीवरचा निसर्ग वाचवण्यासाठी दूरगामी धोरणे आखण्याची गरज आहे.

वाढते तापमान आणि निसर्गाचा कोप ही धोक्याची घंटा आहे. विकास म्हणजे केवळ सिमेंटचे बांधकाम नव्हे, तर माणसाचा आनंद आणि निसर्गाचा समतोल होय. जेव्हा आपले लोकप्रतिनिधी स्वतःला 'मालक' न समजता 'सेवक' समजून निसर्गपूरक जीवनशैलीला प्रतिष्ठा देतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने सुराज्य येईल. साधी राहणी आणि निसर्गाशी नाते जोडूनच आपण समृद्ध आणि शाश्वत भविष्याकडे वाटचाल करू शकतो.असे मत उरण मधील सामाजिक कार्यकर्ते विलास गावंड यांनी व्यक्त केले आहे.

# सोसायट्यांचे एसटीपी प्लॅन्ट रडारवर

## सोसायट्यांनी सांडपाणी करणारी प्रक्रिया एसटीपी प्लॅन्ट बंदचं

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे शहरासह उपनगरातील ज्या मोठ्या गृहनिर्माण सोसायट्या सांडपाण्यावर प्रक्रिया न करता शुद्ध पाण्याचा अपव्यय करत आहे यावर महापालिकेने सोसायट्या मधील जंग खात असलेले एसटीपी प्लॅन्ट सूरू नसेल तर त्या सोसायट्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे यात शहरासह उपनगरातील सोसायट्यांना महानगरपालिका नोटीस बजावणार आहे वारंवार सूचना देऊनही पर्यावरणाप्रती उदासिनता दाखवणा-या सोसायट्यांनी एसटीपी प्लॅन्ट तातडीने सूरू केले नाही तर या सोसायट्यांचे नळ थेट खंडीत करणार आहे शहरासह अनेक ठिकाणी पाणी प्रश्न समोर येत आहे लोकसंख्येच्या तूलनेत पाण्याची उपलब्धता कमी आहे यात टँकर माफी यांचा सुळसुळाट दिवसेंदिवस वाढत आहे अनेक सोसायट्या नियमांची पायामल्ली करतांना दिसत आहे अशा परिस्थितीत सोसायट्यांमध्ये निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करणे आणि त्यांचा पुनर्वापर करणे गरजेचे आहे अनेक सदानिका असलेल्या प्रक्रल्पांना स्वतःची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा ( एसटीपी प्लॅन्ट) उभारलेले असतांनाही सोसायट्यातील रहिवाश्यांवर जास्त खर्चाचा ताण पडतो म्हणून हे प्लॉट जंग खात पडलेले आहे सुरूवाती पासुन या प्लॉटचा वापरणं केला नसल्या कारणाने आता हे प्लॉट सुरू करायचे म्हटले तर जंग खात पडलेले एसटीपी प्लॅन्ट सुरू करण्यात करिता फार मोठा खर्च करावा लागणार असल्याचे वृत्त आहे एक प्राथमिक दृष्टीने विचार केला तर हे प्लॉट सोसायट्या करिता फायदे मंद आहे या प्रक्रियेतून शुद्ध झालेले पाणी बागेसाठी,वाहने धूण्यासाठी, फ्लशिंगसाठी वापरणे अनिवार्य आहे अनेक सोसायट्या फक्त केवळ कागदोपत्री प्रक्रल्प दाखवून प्रत्यक्षात ईतर



कामासाठी पिण्याचे पाणी वापर करत असल्याचे दिसत आहे अनेक सोसायट्यांनी सुरूवाती पासून हा प्लॉट सुरू न केल्याने जंग खात पडलेला हा प्लॉटला सुरू करण्यासाठी खर्च जास्त येतो आणि प्लॉट सुरू असलातरी देखभालीचा खर्च जास्त येत असल्याचे कारण पुढे केलेले आहे अनेक सोसाट्यांना महापालिका यांनी नोटीस दिलेल्या असतांनाही या सोसायट्यांनी कोणतीही हालचाल न केल्याने या नंतर महापालिका सोसायट्यांचे पाणी बंद करण्याची तयारी करत आहे यावर सोसायट्यांनी जर तातडीने एसटीपी सुरू केले नाही तर त्यांचे नळजोड कायमस्वरूपी खंडीत केले जाणार असल्याचे संकेत महापालिकेने दिले आहे पर्यावरणाचे रक्षण आणि पाण्याची बचत यात कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याने या प्रकरणाने बंद आणि जंग खात पडलेले प्लॅंट सुरू करण्यात करिता सोसायट्यांना पर्यायच उरलेला दिसत नाही जर प्लॅन्ट सुरू न केल्यास नळतोड होईल आणि यानंतर महापालिकेच्या अनेक समस्येला तोंड द्यावे लागेल म्हणून आज तरी सोसायट्यांचे धाबे दनानलेले दिसत आहे .


# भिगवणच्या पावसाळी समस्यांवर उपाययोजनांसाठी NHAI कडे पाठपुरावा

## ड्रेनेज लाईन, प्रकाशयोजना व सेवा रस्त्यांच्या सुधारणांसाठी निवेदन; प्रोजेक्ट हेड फणीकुमार मुला यांनी दिले सकारात्मक आश्वासन

**भिगवण । अरुण भोई**

भिगवण शहराला दरवर्षी पावसाळ्यात भेडसावणाऱ्या पावसाच्या पाण्याच्या समस्यांबाबत आज पाटस टोलनाका येथील प्रोजेक्ट हेड फणीकुमार मुला साहेब यांची भेट घेऊन महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली. या बैठकीत भिगवण परिसरातील विविध मूलभूत अडचणी मांडत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) कडे ठोस उपाययोजना सुचविण्यात आल्या.

यामध्ये प्रामुख्याने हॉटेल श्रीशांत ते मदनवाडी चौफुला या सर्व्हिस रोडलगत मोठी ड्रेनेज लाईन उभारण्याची मागणी करण्यात आली. यामुळे पश्चिमेकडील डोंगर परिसरातून येणारे पावसाचे पाणी मोठ्या नाल्यामधून सुरळीत वाहून जाईल आणि शहरातील पूरस्थिती कमी होण्यास मदत होईल, असे सांगण्यात आले.तसेच, जुन्या ड्रेनेज लाईनमधील पाण्याचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे व्हावे यासाठी मोठ्या चेंबरच्या माध्यमातून त्याची विभागणी करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. याशिवाय, एस.टी. स्टॅण्ड समोरील पुलावर स्ट्रेट लाईट पोल बसवण्याचे काम अद्याप अपूर्ण असून ते तातडीने पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.नवीन प्रस्तावांमध्ये श्रीशांत हॉटेल ते दत्तकला स्कूल, चिंचोली या मार्गावर नव्याने सर्व लाईट पोल बसवावेत, अशीही विनंती करण्यात आली. या मार्गावर प्रकाशयोजना झाल्यास नागरिकांच्या सुरक्षिततेस मोठा हातभार लागणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.या बैठकीत पाटस टोलनाका प्रमुख फणीकुमार मुला साहेब व त्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यांनी भिगवणच्या सर्व अडचणी सविस्तरपणे ऐकून घेतल्या व संबंधित विषयांवर सकारात्मक विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पुणे जिल्हा उपाध्यक्ष अजिंक्य माडगे, पुणे जिल्हा कोषाध्यक्ष सचिन बोगावत, माजी उपसरपंच प्रदीप वाकसे, राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष अमोल देवकाते आदी मान्यवर उपस्थित होते.भिगवणच्या नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्यासाठी स्थानिक पातळीवर सुरू असलेला हा पाठपुरावा कौतुकास्पद ठरत असून, लवकरच या मागण्यांवर कार्यवाही होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# पनवेल महानगरपालिकेची सर्व प्रभागात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण हटाव मोहिम

## सर्व पर्यवेक्षक बदलले, तर एकाचे निलंबन

**पनवेल । प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेमार्फत गेल्या काही दिवसापासून अतिक्रमण हटाव संदर्भात मोठ्या प्रमाणात मोहिम सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत कोणत्याही अतिक्रमणाबाबत दुर्लक्ष केले जाणार नाही. तसेच कामाबाबत कसूर करणाऱ्यांच्याबाबत गय केली जाणार नाही. अतिक्रमणाबाबत कारवाई करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत दक्षतेने, जागरूकतेने कारवाई करावी. कोणत्याही अमिषास बळी पडू नये, अन्यथा त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देशआयुक्त मंगेश चितळे यांनी दिले आहेत.

**सर्व प्रभागात कारवाई**

गेल्या काही दिवसांपासून कामोठे, खारघर, पनवेल, कळंबोली अशा चारही प्रभागात अतिक्रमणाबाबतच्या तक्रारी, विविध माध्यमातून येत होत्या, त्यावर आळा घालण्यासाठी आयुक्तांनी कठोर कारवाईची पाऊले उचलली असून अतिक्रमण विभागात सध्या कार्यरत असलेल्या सर्व पर्यवेक्षकांना बदलले. तसेच त्यांच्या जागी अन्य विभागातील पर्यवेक्षक देण्यात आले आहेत. अतिक्रमण हटाव कामात हलगर्जीपणा केल्याचे निर्दशनास आल्याने पर्यवेक्षक प्रशांत गायकर यांना निलंबित केले आहे.

अतिक्रमण विभागाच्यावतीने सध्या जोरदार कारवाई सुरू असून यात प्रामुख्याने अनधिकृत बॅनर व होर्डिग्जवर तोडक तसेच अनधिकृत आठवडी बाजारांवरही कारवाई करण्यात आली.

> “ अतिक्रमणाबाबत नागरिकांना कोणतीही तक्रार करावयाची असल्यास महापालिकेच्या पनवेल कनेक्ट पवर करावी, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात येत आहे.

आठवडी बाजार बंद करण्यात आले. याचबरोबरीने फूटपाथवरील अतिक्रमणाविरोधातही कारवाई करण्यात आली आहे. खारघर येथील मोठमोठ्या हॉटेल्स बाहेरील सिमांत भागातील बांधकामांवर तोडक कारवाई करण्यात आली आहे. कामोठ्यातील नर्सरी व हातगाड्यांवर तोडक कारवाई करण्यात आली.

**विशेष टास्क फोर्स**

महापालिकेमार्फत अतिक्रमण हटाव मोहिमेसाठी विशेष टास्क फोर्स तयार करण्यात येत आहे. यामध्ये १० सुरक्षा रक्षक व १० अतिक्रमण विभागाचे कर्मचारी असतील.तसेच रात्रीच्या वेळीही गस्त घालण्यात येणार आहे. अतिक्रमण संदर्भात विशेष दखल घेत प्रभागनिहाय महापालिका सदस्यांच्या समवेत बैठका घेऊन, त्यांच्याकडून आलेल्या सूचनांची तात्काळ दखल घेण्यात येत आहे, अशी माहिती अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी दिली आहे.

# माझ्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्र २ ची कामे देण्यात येवून त्यांना दिलासा द्यावा-अरविंद म्हात्रे

## भूमिहीन झालेली माझा शेतकरी या कामाच्या माध्यमातून तरी सावरेल

**पनवेल । प्रतिनिधी**

नवी मुंबई प्रकल्पासाठी पनवेल महानगर पालिका हद्दीतील शेतकऱ्यांच्या जमिनी घेऊन त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन हिरावून घेतले. त्यांना निराधार केले आहे. त्यांना आधार देताना त्यांना उभे करताना पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडको प्रकल्पग्रस्त शेतकरी व त्यांच्या वारसांना महानगरपालिकेची प्र.२ श्रेणीतील कामे देण्यात यावी अशी मागणी विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी प्रकल्पग्रस्तांच्या वतीने पालिका आयुक्त यांच्याकडे केली आहे.

सिडको (CIDCO - City and Industrial Development Corporation) ही महाराष्ट्र शासनाचा एक उपक्रम आहे, जी नवी मुंबई आणि परिसरातील नगर नियोजन आणि विकासाचे काम करत आहे. ही कामे सिडकोच्या माध्यमातून सिडकोने विकसित केलेल्या शहरातील मुख्य कामे ऋ २ या गोंडस नावाखाली करत आहे. ही कामे प्रकल्पग्रस्तांच्या माध्यमातून केली जात आहेत. सिडकोने विकसित केलेल्या शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था आणि मलनिस्सारण व्यवस्था यासारखी महत्त्वाची कामे येथील प्रकापग्रस्तांच्या माध्यमातून करत आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने देखील प्रकल्पग्रस्त शेतकरी आणि त्यांच्या वारसांना सहारा देताना अग्रक्रमाने पालिकेची कामे येथील प्रकापग्रस्तांना दिलेली आहेत असे समजते. त्याप्रमाणे पनवेल महानगर पालिकेने पालिका हद्दीतील कामे प्र २ च्या नावाखाली देण्यात येऊन माझ्या प्रकल्पग्रस्तांना दिलासा द्यावा अशी मागणी अरविंद म्हात्रे यांनी केली आहे. पनवेल महानगर पालिकेत २९ गावे समाविष्ट झाल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना सिडकोमधील कामे मिळण्यास अडचण येत आहेत. तरी प्रकल्पग्रस्त संघटनेला महानगरपालिकेतील कामे कशा पध्दतीने अग्रक्रमाने देता येतील. यावावत योग्य ते मार्गदर्शन आणि त्यानुसार योग्य तो उपाययोजना करण्यात यावी असेही त्यांनी आयुक्त मंगेश चितळे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# अनिरुद्ध वनकर यांची अध्यक्षपदी नियुक्ती

**मुंबई । प्रतिनिधी**– महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाच्या अध्यक्षपदी अनिरुद्ध वनकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव के.सी.वेणुगोपाल यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात त्यांची नियुक्ती केल्याचे म्हटले आहे.त्यांच्या नियुक्तीने राज्यभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# मुंबई मनपा अर्थसंकल्पाची तूट म्हणजे व्यवस्थापन धोरणाबाबत विसंगती : नगरसेवक अमीर नसीम खान

**मुंबई । नासिकेत पानसरे**

मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात ५,३७१.८ कोटींची तूट (वित्तीय कमतरता) दर्शवण्यात आली आहे; ही तूट अर्थसंकल्पीय विभागांमधून निधी भरून काढण्याचा प्रस्ताव आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, अर्थसंकल्पीय दस्तऐवजाच्या विभागांकडे स्वतःचे अत्यंत मर्यादित आर्थिक स्रोत आहेत अर्थसंकल्पीय विभागाकडून आर्थिक मदत पुरवली जाते. अर्थसंकल्पातील तूट व्यवस्थापनाच्या धोरणाबाबतची ही एक उघड विसंगती यातून समोर येते.अशी चिंता काँग्रेसचे नगरसेवक अमीर नसीम खान यांनी व्यक्त केली.अर्थसंकल्पीय चर्चेत भाग घेताना ते बोलत होते.या पार्श्वभूमीवर, जे आर्थिक स्रोत आधीच कमकुवत आहेत, अशा निधीच्या साठ्यांतून पैसे काढून तूट का भरून काढली जात आहे, हे तर्कसंगत वाटत नाही. हे म्हणजे एका हाताने पैसे द्यायचे आणि दुसऱ्या हाताने ते परत काढून घ्यायचे, यासारखेच आहे आणि अशा पद्धतीमुळे संपूर्ण व्यवस्था अपरिहार्यपणे आणखीच कमकुवत होईल.



या विशिष्ट निधीच्या साठ्यातून पैसे काढल्यास, मुंबईतील रस्ते काँक्रीटीकरण, जलशुद्धीकरण प्रकल्पांचा विकास, जोड रस्ते आणि पूल यांसारखे महत्त्वाचे पायाभूत सुविधा प्रकल्प ठप्प पडण्याची शक्यता आहे. यामुळे विकासाचा वेग अपरिहार्यपणे मंदावेल. परिणामी, याचा सामान्य जनता आणि शहराची मूलभूत पायाभूत सुविधा या दोन्हीवर अत्यंत गंभीर आणि प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.याकडे त्यांनी लक्ष्य वेधले त्याचप्रमाणे शिक्षणासाठी अर्थसंकल्पीय विभागातून २,१८४ कोटींची रक्कम काढून घेणे, हा मुंबईतील वंचित मुलांवर विशेषतः झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या आणि शिक्षणासाठी महानगरपालिकेच्या शाळांवर अवलंबून असलेल्या मुलांवर-केलेला एक गंभीर अन्याय आहे.याकडे नगरसेवक अमीर खान यांनी लक्ष्य वेधले.शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या आकडेवारीनुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण विद्यार्थ्यांचे प्रमाण प्रचंड आहे. शिक्षणातील गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी, मुंबई मनपा शाळांकरिता शाळा निरीक्षकांची भरती प्रक्रिया पूर्ण होणे, इतर सर्व रिक्त पदे भरणे आणि संपूर्ण कार्यप्रणालीवर काटेकोर देखरेख ठेवणे अत्यावश्यक आहे.शिवाय, आपल्या प्रादेशिक भाषांमध्ये कार्यरत असलेल्या शाळांना अधिक बळकट करण्याची गरज आहे.याव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांच्या गळतीची प्रत्यक्ष आकडेवारी-वार्डनिहाय आणि शाळा-निहाय वर्गीकृत करून सार्वजनिकरीत्या उपलब्ध करून देण्यासाठी एक कार्यप्रणाली उभारण्याची तातडीची आवश्यकता असल्याची माहिती सभागृहात नगरसेवक अमीर नसीम खान यांनी दिली.

# परांजपे स्कीम्सच्या ‘अथश्री’ला २५ वर्षे पूर्ण; भारतातील ज्येष्ठ नागरिक निवास क्षेत्रात ६,००० रहिवाशांचा टप्पा, भविष्याभिमुख दृष्टीकोन अधोरेखित

**पुणे । प्रतिनिधी**

नवे निवासी प्रकल्प साकारण्यात अग्रणी असलेल्या परांजपे स्कीम्स (कन्स्ट्रक्शन) प्रा. लि. या नामांकित विकसकाच्या ‘अथश्री’ या ज्येष्ठ नागरिक निवास उपक्रमाला २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. भारतातील संघटित ज्येष्ठ नागरिक निवास क्षेत्राच्या घडणीत ‘अथश्री’ने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दूरदृष्टीतून सुरू झालेला हा उपक्रम आज सन्मान, स्वावलंबन आणि समुदायाधारित जीवनमूल्यांवर आधारलेली सक्षम व्यवस्था बनली आहे.या महत्त्वपूर्ण टप्प्याचे औचित्य साधत, वडोदरा येथे ‘अथश्री’च्या ६,००० व्या रहिवाशाला घराचा ताबा देण्याचा सोहळा पार पडला. या कार्यक्रमात रहिवासी, व्यवस्थापन आणि भागीदार सहभागी झाले होते. आज ‘अथश्री’चे जाळे सुमारे १६ ज्येष्ठ नागरिक वसाहतींमध्ये विस्तारले असून, विविध शहरांमध्ये ३,००० हून अधिक ज्येष्ठ नागरिकांना निवास व सुविधा दिल्या जात आहेत. कार्यक्रमाची सुरुवात परांजपे स्कीम्सचे अध्यक्ष श्रीकांत परांजपे यांच्या भाषणाने झाली. त्यानंतर व्यवस्थापकीय संचालक शशांक परांजपे यांनी ‘अथश्री’चा प्रवास आणि वाढती गरज याविषयी मनोगत व्यक्त केले. यानंतर ‘अथश्री’मधील रहिवाशांनी सादर केलेल्या कलाप्रस्तुतींनी या समुदायातील उत्साह आणि सक्रिय जीवनशैली अधोरेखित केली.या निमित्ताने परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन प्रा. लि.चे व्यवसाय विकास संचालक अमित परांजपे यांनी आरोग्यसेवा, वेलनेस, आपत्कालीन मदत आणि समुदाय सहभाग या क्षेत्रांमध्ये नव्या भागीदारी जाहीर केल्या. या उपक्रमांतर्गत अग्रगण्य आरोग्य संस्थांशी सहकार्य करून ओपीडी, आयसीयू, लघु शस्त्रक्रिया सुविधा तसेच कार्डियाक ॲम्ब्युलन्स आणि ऑन-कॉल पॅरामेडिक सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासोबतच पडल्यास तत्काळ इशारा देणारी आणि महत्त्वाच्या आरोग्य निर्देशकांचे रिअल-टाइम निरीक्षण करणारी हेल्थ मॉनिटरिंग प्रणाली सुरू केली जाणार आहे, ज्याची माहिती डॉक्टर आणि कुटुंबीयांना उपलब्ध राहील. वेलनेस उपक्रमांतर्गत योग संस्था आणि तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मदतीने नियमित योग व फिटनेस कार्यक्रम राबवले जातील. तसेच ऋगएड डलहेश्र, उराश्रळप, जीळसराळ चळींर आणि कन्सिअर्ज सेवा देणाऱ्या संस्थांबरोबरच्या सहकार्याद्वारे सर्जनशील उपक्रम, शिक्षण आणि घरगुती सहाय्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.कार्यक्रमानंतर ‘अथश्री’मधील उल्लेखनीय योगदान देणाऱ्या रहिवाशांचा विशेष सत्कार करण्यात आला. यात अणु विज्ञान आणि सिग्नल प्रोसेसिंग क्षेत्रातील अग्रगण्य शास्त्रज्ञ डॉ. मोहन फडणीस; पद्मश्री पुरस्कार विजेते आणि आयआयटी कानपूरचे माजी संचालक संजय गोविंद धांडे; १९७१ च्या




युद्धातील शौर्यासाठी वीरचक्र सन्मानित विंग कमांडर सुरेश कर्णिक; कर्करोग संशोधन क्षेत्रातील मान्यवर आणि टाटा मेमोरियल सेंटरच्या माजी वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रिता मुल्हेरकर; तसेच मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री वंदना गुप्ते यांचा समावेश होता. या सत्कार सोहळ्याने ‘अथश्री’ समुदायातील अनुभव, कर्तृत्व आणि सक्रिय जीवनशैली अधोरेखित केली.

यावेळी बोलताना व्यवस्थापकीय संचालक शशांक परांजपे म्हणाले, ज्येष्ठ नागरिक सन्मानाने आणि स्वावलंबीपणे राहू शकतील अशी जागा निर्माण करण्याच्या साध्या विचारातून सुरू झालेला हा प्रवास आज हजारो लोकांचा विश्वास संपादन करणाऱ्या वास्तवात परिवर्तित झाला आहे. अक्षय तृतीया या शुभ दिवशी हा टप्पा गाठल्याने या सोहळ्याचे महत्त्व अधिक वाढले आहे. ज्येष्ठ नागरिक निवास म्हणजे केवळ घरे उभारणे नव्हे, तर जिथे प्रत्येकाला आपलेपणाची जाणीव होते, असे वातावरण निर्माण करणे हा आमचा उद्देश आहे. नाशिक, कोल्हापूर, नागपूर तसेच अहमदाबाद आणि जयपूरसारख्या शहरांमध्येही या क्षेत्राची मागणी झपाट्याने वाढत आहे.भारतामध्ये ज्येष्ठ नागरिक निवास क्षेत्राचा विस्तार ‘सिल्वर इकॉनॉमी’च्या वाढीसोबत जोडलेला आहे. वाढती आयुर्मर्यादा, बदलती कुटुंबरचना आणि स्वावलंबी जीवनशैलीची वाढती पसंती यामुळे हे क्षेत्र आता मर्यादित पर्याय न राहता मुख्य प्रवाहातील निवासी व्यवस्थेचा भाग बनत आहे.अमित परांजपे म्हणाले, भारतामध्ये ज्येष्ठ नागरिक निवास क्षेत्र नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे. पूर्वी गरज म्हणून घेतला जाणारा निर्णय आता नियोजनबद्ध आणि जागरूक निवड बनत आहे. अनेक मिलेनियल्स आपल्या पालकांसाठी अशा समुदायांमध्ये गुंतवणूक करताना दिसत आहेत. महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण धोरण २०२५ अंतर्गत ज्येष्ठ नागरिक निवासासाठी स्वतंत्र श्रेणी आणि १,००० इतक्या नाममात्र स्टॅम्प ड्युटीची तरतूद हा या क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण निर्णय ठरणार आहे.भारताची लोकसंख्या रचना आणि सामाजिक परिदृश्य झपाट्याने बदलत असताना ‘अथश्री’सारखे उपक्रम वृद्धत्वाचा अनुभव नव्याने परिभाषित करत आहेत. काळजी, स्वावलंबन आणि सामाजिक जोड यांचा समतोल साधणारे असे समुदाय भविष्यातील ज्येष्ठ नागरिक निवासाची दिशा ठरवत आहेत.

# भूमाफियांनी शेतकऱ्यांवर जबरदस्तीने दाखल केले गुन्हे मागे घ्या-दिवा मनसे

**संतोष पडवळ । ठाणे**



दिनांक २०/४/२०२६ रोजी भूमाफियांनी दिवा, साबेगाव भागातील शेतकऱ्यांवर जबरदस्तीने दाखल करण्यात आलेले गुन्हे तात्काळ मागे घेण्याबाबत दिवा मनसेचे विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी मागणी केली आहे. पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अंतर्गत दाखल करण्यात आलेले कलम १५ व १७ अंतर्गत गुन्हा दाखल केलेले असून दाखल केलेल्या गुन्ह्यामध्ये नंबर २, १० व १४ मजकुरामध्ये चुकीच्या पद्धतीने काही शेतकऱ्यांची नावे टाकण्यात आलेली आहेत सदर जमिनीवर काही भूमापियांनी पत्र्याचं कंपाउंड मारून त्याच्यावर कांदळवनाची कत्तल करून तेथे भराव टाकत आहेत शेतकऱ्यांना त्या जागेमध्ये प्रवेश देखील दिली जात नाही या बाबत वारंवार शेतकऱ्यांनी मुंब्रा पोलीस स्टेशन व तहसील कार्यालयात तक्रार देखील दिली आहे. तरी देखील भूमाफियांनी संबंधित शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. प्रकरणी दिवा मनसेचे विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांनी योग्य ती शहनिशा करून शेतकऱ्यांवर होणारे अन्याय कायमचे दूर करावे व त्यांच्यावर नजरचुकीने दाखल करण्यात आलेल्या एफ आय आर मधून त्यांची नावं काढून टाकण्यात यावी ही निवेदनाद्वारे मागणी केली आहे.



**विक्रोळी कन्नमवार नगरातील जनता मार्केट, जयभवानी चौकातील,शिवसाई मित्र मंडळाच्या गुरुनाथ मंदिर याचा मंदिर जीर्णोद्धार विक्रोळीचे आमदार सुनील राऊत यांच्या शुभहस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला.त्या प्रसंगी विक्रोळी विधानसभा उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानसभा संघटक शंकर ऊर्फ नाना ढमाले, उपविभाग महिला संघटिका वंदना बेंद्रे, शाखा प्रमुख प्रकाश पुजारे, महिला संघटिका आसावरी भोईटे, मंडळाचे अध्यक्ष प्रदीप ऊर्फ बाबू वेंगुर्लेकर, सरचिटणीस सुरेश सावंत, खजिनदार मनोज गवळी आदी मान्यवर उपस्थित होते.**

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५